**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - महादेव अभीनाथ घागरे
वय - ३५ वर्षे
व्यवसाय - नोकरी पोकॉ १७८
रा/ने - मालवण पोलीस ठाणे, ता. मालवण जि. सिंधुदूर्ग.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. दि. १९/०३/२०२५ रोजी माझी नेमणूक मालवण पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून होती. दि. २०/०३/२०२५ रोजी पोहेकॉ शिंदे यांनी गुन्हा क्र. ४२/२०२५ मध्ये पंचनामा करण्याकरीता फोटो काढण्याकरीता मला फिर्यादीच्या घरासमोर सागरी महामार्ग रेवतळे सोबत नेले होते. त्यावेळेस पोहेकॉ शिंदे घटनास्थळ पंचनामा करताना मी माझ्या वापरातील मोबाईल मॉडेल नं. वन प्लस नॉड् सीई-२ या मोबाईलवरुन फोटो काढत होतो. मी एकूण तीन फोटो काढले. घटनास्थळ पंचनामा पुर्ण झाल्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन येथे आलो. मी माझा वापरता मोबाईल माझ्या वापरत्या लॅपटॉपला केबलव्दारे कनेक्ट केला व त्याच्यावरील फोटो लॅपटॉपमध्ये घेतले. त्यानंतर सदर तीनही फोटो एक पेजवर बसवून त्याची प्रिंट काढली. सदर प्रिंट काढल्यानंतर मी ती प्रिंट तपासिक अंमलदार पोहेकॉ शिंदे यांना दिली. मोबाईल, लॅपटॉप व प्रिंटर हे चालू स्थितीमध्ये होते. मी तपासिक अंमलदार यांना फोटोची प्रिंट सोबत भारतीय साक्ष अधिनियमचे कलम ६३ प्रमाणे प्रमाणपत्र दिले. मला दाखविण्यात आलेले प्रमाणपत्र तेच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **<u>नि.क्र. पी५/पीडब्ल्यू४</u>** देण्यात येते. मला दाखविण्यात आलेले फोटो तेच आहेत. सदर फोटोग्राफ हे वस्तुस्थितीदर्शक आहेत. त्यामध्ये दर्शविलेली वस्तुस्थिती खरी व बरोबर आहे. तीन ही फोटोनां एकत्र **<u>निशाणी क्र. पी६/पीडब्ल्यू४</u>** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.एस.के.जाधव यांचेमार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या पोलीस स्टेशन मध्ये डयुटी रजिष्टर मेंटेन केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, दि. १९/०३/२०२५ तसेच दि. २०/०३/२०२५ रोजी मी मालवण पोलीस स्टेशन येथे नोकरीवर हजर होतो हे दाखविण्याकरीता मी तपासिक अंमलदार

यांना कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईलवरुन एखादा फोटो काढल्यानंतर तो फोटो गॅलरीमध्ये सेव्ह होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर कामी प्रमाणपत्रामध्ये माझ्या फोनच्या गॅलरीमध्ये एकूण किती फोटो होते हे नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसे नमूद करण्यास कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दि. २०/०३/२०२५ रोजी तपासिक अंमलदार पोहेकॉ शिंदे यांनी मला पंचनामा करीता फिर्यादीच्या घरासमोर सागरी महामार्ग येथे फोटो काढण्यासाठी नेले होते ही बाब माझ्या प्रमाणपत्रामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या मोबाईलवरुन फोटो काढले तो मोबाईल माझ्या मालकीचा होता हे दाखविण्याकरीता मी तपासिक अंमलदार यांना कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोबाईल अपडेट झाल्यानंतर त्यामध्ये एआय टूलचा फिचर देखील ॲड झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, एआय टूलच्या माध्यमातून फोटोमध्ये अदलाबदल करता येते. हे म्हणणे खरे आहे की, एखादा फोटो कॅम्प्युटर मध्ये किंवा लॅपटॉपमध्ये घेताना देखील त्यामध्ये बदल करता येतो.

३. हे म्हणणे खरे नाही की, दि. २०/०३/२०२५ रोजी मी पंचनाम्या करतेवेळी फोटो काढण्याकरीता घटनास्थळावर गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रमाणपत्रावरुन दि. २०/०३/२०२५ रोजी मी कथीत घटनास्थळावर जावून फोटो काढले ही बाब दिसून येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कथीत घटनास्थळावर जावून फोटो काढलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी तपासिक अंमलदार यांच्या सांगण्यावरुन हवे तसे फोटो काढून त्यांना दिले व त्यांना खोटे प्रमाणपत्र दिले. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-
एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.

दि. १०/०४/२०२६